# ‘हिंदू महिला सभे’तर्फे महिलांचा गौरव

**पुणे :** ‘समाजात आज एका बाजूला महिला प्रगती पथावर आहेत; तर दुसरीकडे तिची असुरक्षितता, अवनती दिसत आहे. हा विरोधाभास बदलण्याची गरज आहे,’ असे मत जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर यांनी व्यक्त केले.

जागतिक महिला दिनानिमित्त हिंदू महिला सभेच्या वतीने विविध क्षेत्रातील आठ महिलांचा गौरव करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. निवारा सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमामध्ये जया मोडक, विद्या गाडगीळ, हर्षा शहा, शीला साबळे, मंजुषा सहस्त्रबुद्धे, साधना गोडबोले आणि प्रभा नेने या महिलांचा गौरव करण्यात आला. अध्यक्षस्थानी सुप्रिया दामले होत्या.

गावस्कर यांनी मनोगतात अनेक उदाहरणासह महिलांच्या असुरक्षिततेचे विषय मांडले. ‘सामाजिक जीवनात काम करताना जे अनुभवले, त्याचा परिणाम मनावर होत राहतो. अनेकदा समाजातील विरोधाभास समोर येतो. मुलींचा जन्मदर घटतो आहे. त्याचा कोणी गांभीर्याने विचार करीत नाही. या गंभीर समस्येवर मार्ग काढण्यासाठी सर्व महिलांनी संघटितपणे आवाज उठवण्याची गरज आहे,’ अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. जोगळेकर यांनी सूत्रसंचालन केले; तर दामले यांनी मनोगत व्यक्त केले.